ANNEXURE- III

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

# Trust Deed / Bylaws/ Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))

**Faculty:- Nursing**
**Name of College/Institute:- Blesssing College of Nursing (B.Sc.N)**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | Bhawani Seva Bhavi Sanstha, Kranti Chock Parbhani |
| Registration Certificate | | Trust / Society Society :- MH/139/97 Parbhani<br>Dated - 27/03/1997<br><br>Hospital (Bombay Nursing Act) :- |
| Name of the College / Institute<br>(As per First Affiliation letter) | : | Blessing College of Nursing (B.Sc.N) |
| Address | : | Dharmapuri Tq. Dist.Parbhani |
| Email ID | : | blessingcollegeofnursing@gmail.com |
| Telephone / Mobile No.(s) | : | 9421572041 |
| Website | : | www.blessingnursingpbn.in |
| College Code | : | 154133 |

BLESSING COLLEGE OF NURSING B.Sc. (N) PARBHANI

K. Suwl

**Dean/ Principal Stamp & Signature**

Principal
Blessing College of Nursing (B.Sc.)
Parbhani.

विनेय–घ. श्रो./मु.सा.वि./५० स.

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महा/१३७/९८ परभणी

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की भवानी सेवाभावी संस्था, परभणी, ता. जि. परभणी

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 27 MAR 1997 १९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

संस्थांचे सहायक निबंधक,
सहायक संस्था निबंधक
परभणी विभाग, परभणी विभाग

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

विशेष/ध.आ./मु.सा.वि./रु.

नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये परभणी विभाग परभणी येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव भवानी सेवाभावी संस्था परभणी ता० जि० परभणी

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ओ/ऊ - 3569 (परभणी)

श्री प्रताप भास्करराव देशमुख यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ८/७ १९९८ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
पदनाम परभणी विभाग, परभणी

President
Bhavani Sevabhavi Sanstha
Kranti Chowk, Parbhani

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

::- परिशिष्ट भाग -::

भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. परभणी जि. परभणी.

या संस्थेचे ज्ञापन
(मेमोरेंडम ऑफ असोसिएशन)

१. संस्थेचे नांव :- भवानी सेवाभावी संस्था, परभणी. ता. परभणी जि. परभणी.

२. संस्थेचा पत्ता :- द्वारा प्रताप भास्करराव देशमुख, रा. क्रांती चौक, परभणी ता. परभणी.

३. संस्थेचे ध्येय्य व उद्देश :-

१. संस्थेच्या कार्यक्षेत्रात बालवाडी, अंगणवाडी, प्राथमिकशाळा, माध्यमिकशाळा, उच्च माध्यमिकशाळा, कन्याशाळा, कन्या विद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, विधी, वैद्यकिय, पशुवैद्यकिय, कृषि विद्यालये-महाविद्यालये स्थापण करणे व ती चालविणे.

२. आश्रमशाळा, पोस्टबेसिक आश्रमशाळा, कॉन्व्हेंट स्कुल, पब्लीक स्कुल, निवासीशाळा, सैनिकीशाळा, बालसुधारगृह, बालकामगार शाळा, आदी स्थापण करुन त्या चालविणे.

३. अपंग, मतीमंद, मुकबधीर, अस्थिव्यंग, कर्णबधिर, आदीसाठी शैक्षणिक सुविधा मिळवून देणे तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न करणे.

४. निराधार, निराश्रीत, परित्यक्ता, देवदासी, विधवा, कुमारीमाता, यांचे पुनर्वसनासाठी आवश्यक ते उपक्रम राबविणे, माताबालसंगोपन केंद्र, बालसदन, बालसंगोपन केंद्र, सकस आहार केंद्र, अनाथालय, आदी स्थापण करुन चालविणे.

५. कला, संगीत, नाट्य, पथनाट्य, कवि, साहित्य, कवितासंग्रह राष्ट्रीय एकात्मता, जातीय सलोखा, कविसंमेलने, अभ्यासमंडळे, ग्रंथ प्रदर्शन, बौध्दिकस्पर्धा, शारिरीकस्पर्धा, आदींचे आयोजन करणे.

सांस्कृतिक कार्यक्रम उदा. प्रवचन, किर्तन, भजन, नृत्य, गायन, लोककला, कलानाट्य, शास्त्रीय संगीत, गायन-वादन आदी राबविणे.

७. कलागृहांची स्थापना करुन ती चालविणे.

८. ग्रंथालय, क्रिडा मंडळ, व्यायामशाळा, कुष्ठधाम, कुष्ठरोग निर्मुलन केंद्र, एड्स निदान केंद्र, साथीचे रोग नियंत्रण केंद्र, प्राथमिकआरोग्य केंद्र, कुटुंब नियोजन केंद्र, कुटुंब नियोजन/कल्याण, आदी उपक्रम राबविणे.

९. तांत्रिकशिक्षण, अपंगशेल्टर्ड वर्कशॉप, बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्र, पर्यावरण, मत्स्यधारण, भुजल रक्षण, मातापरिक्षण, वनीकरण आदी संकल्पना राबविणे.

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी.

पान क्र. २ वर

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

४. "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेचा कारभार व व्यवस्था सोपविण्यात आला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सभासदाचे संपूर्ण नांव व पत्ता | पद | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रताप भास्करराव देशमुख<br>रा. क्रांती चौक, परभणी | अध्यक्ष | २७ | समाजसेवा | भारतीय |
| २. | श्री. सुधाकर गणेशराव पाटील<br>रा. शिवराम नगर, परभणी | उपाध्यक्ष | ३६ | गुत्तेदारी | -"- |
| ३. | श्री. अब्दुल हाई अब्दुल करीम<br>रा. क्रांती चौक, परभणी | सचिव | २७ | समाजसेवा | -"- |
| ४. | श्री. दिगंबर नारायणराव थोरात<br>रा. क्रांती चौक, परभणी | सहसचिव | २८ | शिक्षण | -"- |
| ५. | श्री. श्यामसुंदर हिरामनराव खांबरे<br>रा. क्रांती चौक, परभणी | कोषाध्यक्ष | २७ | शिक्षण | -"- |
| ६. | श्री. महेश विठ्ठलराव शिंदे<br>रा. क्रांती चौक, परभणी | सदस्य | २३ | शिक्षण | -"- |
| ७. | श्री. राजेंद्र नामदेवराव शिंदे<br>रा. मंगळवारा, परभणी | सदस्य | २६ | शिक्षण | -"- |

५. आम्ही खालील सह्या करणारे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी." या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये आम्ही केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी". ही संस्था आज दिनांक १५.१२.९६ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

पान क्र. ३ वर.....

सचिव
भवानी सेवाभावी संस्था
मु.परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

| अ. क्र. | सभासदाचे संपुर्ण नांव व पत्ता | सही. |
|---|---|---|
| १. | श्री. प्रताप भास्करराव देशमुख<br>रा. क्रांती चौक, परभणी | |
| २. | श्री. सुधाकर गणेशराव पाटील<br>रा. शिवराम नगर, परभणी | |
| ३. | श्री. अब्दुल हाजी अब्दुल करीम<br>रा. क्रांती चौक, परभणी | |
| ४. | श्री. दिगंबर नारायणराव थोरात<br>रा. क्रांती चौक, परभणी | |
| ५. | श्री. शामसुंदर हिरामनराव कांबळे<br>रा. क्रांती चौक, परभणी | |
| ६. | श्री. महेश विठ्ठलराव शिंदे<br>रा. क्रांती चौक, परभणी | |
| ७. | श्री. रविंद्र नामदेवराव शिंदे<br>रा. मंगळवारा, परभणी | |

दिनांक :- २०. १२. ९६
ठिकाण :- प र भ णी

वरील सर्व सह्या करणारे यांना मी ओळखतो,
त्यांनी माझ्यासमक्ष या सह्या केल्या आहेत.

सही व शिक्का.

२.१.९७

लक्ष्मीकांत गणपतराव दिवाण
चिंचटाकळीकर
बी. ए. एल. एल. बी, अॅडव्होकेट.
क्रांती चौक, परभणी. ४३१४०१

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

:- परिशिष्ट "अ" -:

"भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. परभणी जि. परभणी"

या संस्थेचे

( नियम व नियमावली )

१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची परिभाषा :-

* संस्था म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेस समजण्यात येईल.

* अध्यक्ष म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेचे अध्यक्ष असे समजण्यात येईल.

* उपाध्यक्ष म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजण्यात येईल.

* सचिव म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेचे सचिव असे समजण्यात येईल.

* सहसचिव म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेचे सहसचिव असे समजण्यात येईल.

* कोषाध्यक्ष म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेचे कोषाध्यक्ष असे समजण्यात येईल.

* कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असे समजण्यात येईल.

* सभासद म्हणजे "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी" या संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सभासद यांना समजण्यात येईल.

२. कार्यक्षेत्र :-

या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असे मर्यादित राहील.

पान क्र. २ पर.....

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था,
परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

३. हिशोबाचे वर्ष :-

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४. सभासदत्व व त्यांचा नोंदणीची पध्दत :-

१८ वर्षावरील कोणत्याही भारतीय नागरिकास या संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. त्याकरीता त्यांना संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यावर सभासदत्वासाठी निर्धारित केलेली रक्कम संस्थेकडे जमा केल्यानंतर त्यांची नोंद सभासद रजिस्टर मध्ये करण्यात येईल.

५. सभासदाचे प्रकार :-

संस्थेचे सभासद दोन प्रकारचे राहतील.

१. आजीव सभासद :-

रूपये १०१ /- वर्गणी देणा-या सभासदास या संस्थेचे आजीव सभासद असे समजण्यात येईल.

२. साधारण सभासद :-

रूपये ११ /- किंवा त्यापेक्षा अधिक वार्षिक वर्गणी देणा-या व्यक्तीस या संस्थेचे साधारण सभासद असे समजण्यात येईल.

६. सभासदत्व रद्द होणे :-

कोणताही सभासद कायदेशिर गुन्हेगार ठरला असेल तर, सभासद वर्गणी दिली नसेल तर, मरण पावला असेल तर, देश सोडून परदेशांत गेला असेल तर, किंवा संस्थेला नुकसान पोहोचविल असे निदर्शनास आल्यास कार्यकारी मंडळाने बहुमताने प्रस्ताव पास करून काढून टाकल्यास त्याचे सभासदत्व रद्द झाले असे समजण्यात येईल.

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

७. सर्वसाधारण सभा व तिचे कार्य आणि अधिकार :-

सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजण्यात येईल. ही सभा वर्षातून एकदा तरी घेतली गेली पाहिजे. या सभेस संस्थेचे सर्व प्रकारचे सभासद सहभागी होतील. कार्यकारी मंडळाने पास केलेल्या कामावर नियंत्रण ठेवणे, वार्षिक हिशोब मंजूर करणे, पुढील नवीन वर्षाचे अंदाजपत्रक तयार करणे, कार्यकारी मंडळाच्या पदाधिकारी यांची निवड करणे. वेळेवर येणाऱ्या ठरावांवर निर्णय देणे.

८. सर्वसाधारण सभेच्या सुचना व गणसंख्या :-

सर्वसाधारण सभेच्या सुचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण, व सभेचे विषय आदी नमूद करणे आवश्यक राहील. सुचना सर्व सभासदांना देणे डाक पुस्तकाने अथवा टपालाद्वारे सभेच्या किमान चौदा दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांत सर्वसाधारण सभा उपस्थिती झाल्यानंतर सभेचा गणसंख्या पुर्ण झाला असे समजण्यात येईल. गणसंख्येअभावी तहकूब झालेल्या सभेस कोरमचे बंधन राहणार नाही. परंतु त्यास पुन्हा सुचना देणे आवश्यक राहील.

९. विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्ये :-

अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल. जी कार्ये करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेस आहे ती सर्व कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेस राहील.

पान क्र. ४ वर...

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

१०. संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना :

संस्थेच्या कार्यकारी मंडळात कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ११ पदाधिकारी असु शकतील. त्यांत खालील प्रमाणे पदाधिकाऱ्यांचा समावेश राहील.

अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सचिव-१, सहसचिव-१, कोषाध्यक्ष-१, व अन्य कमीत कमी २ व जास्तीत जास्त ६ पदाधिकारी असु शकतील.

११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील. निवडणूकीची पध्दत गुप्त मतदान पध्दतीने सर्वसाधारण सभेत दर पाच वर्षांना बहुमताने निवडली जाईल.

१२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

अध्यक्ष :-

सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवणे, नोटीस काढुन सभा आयोजित करणे, रक्कमेची देवाण घेवाण करणे वगैरे.

उपाध्यक्ष :-

अध्यक्षांचे गैरहजेरीत अध्यक्षांचे काम करणे, अन्यथा अध्यक्षांना संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे.

सचिव :-

१. संस्थेच्या सभा बोलावणे.
२. संस्थेचा पत्रव्यवहार करणे.
३. तक्रारीचे निवारण करणे.
४. संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे.
५. किरकोळ नियम तयार करणे.
६. संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ते छोटे मोठे अधिकाराचा वापर करणे.

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani

७. वार्षिक हिशोबाची पत्रके तयार करुन सर्वसाधारण सभेसमोर मांडणे.

८. रोजचे हिशोब पाहून त्यावर सह्या करणे.

९. खर्चाची बिले मंजूर करणे.

१०. संस्थेच्या वतीने रकमेची देवाण घेवाण करणे.

११. संस्थेच्या मालमत्तेचा देखरेख करणे.

१२. मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे.

१३. संस्थेच्या दृष्टिने हितावह असलेले इतर कोणतेही काम करणे.

## सहसचिव :-

सचिवाचे गैरहजेरीत सचिवाचे काम करणे अन्यथा संस्थेच्या कार्यात सचिवांना आवश्यक ते सहकार्य करणे.

## कोषाध्यक्ष :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब लिहणे अगर लिहून घेणे, हिशोब पुर्ण झाल्यावर कार्यकारी मंडळासमोर मांडणे, हिशोबाचे पुस्तकातून काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

## कार्यकारी मंडळाचे सभासद :-

कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित रहाणे, निवडणुकीचे वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

## सभासद :-

सर्वसाधारण सभेत उपस्थित रहाणे, निवडणुकीचे वेळी मतदान करणे, व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

पान क्र. ६ वर .....

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

१३. कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीच्या सभा :-

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी तीन सभा निश्चित घेतील. संस्थेच्या कोणत्याही सभासदांनी मागणी केल्यास अध्यक्षांनी किंवा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून पंधरा दिवसाचे आत बोलाविणे बंधनकारक राहील. अशी सभा बोलावितांना सूचनेत मागणीचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील.

१४. कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना दोन दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सूचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. सूचना संस्थेच्या डाक बुकात सही घेऊन अथवा टपालाद्वारे पाठविता येईल. कार्यकारी मंडळाचे ३/५ सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजले जाईल.

१५. कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम :-

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरवील त्या प्रमाणे राहील. ज्या सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे अशा सभासदाला निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही अथवा मतदान करण्याचा सुध्दा अधिकार राहणार नाही.

१६. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्या बाबत :-

कोणत्याही कारणास्तव कार्यकारी मंडळातील पद किंवा पदे रिक्त झाल्यास उरलेल्या कार्यकारी मंडळाच्या बहुमताने ती पद किंवा पदे भरता येतील.

पान क्र. ७ वर..

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी.

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.

कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-

कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवील. सर्व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावांची पूर्तता करील. संस्थेचे काम सुरळीत चालावे म्हणून किरकोळ नियम तयार करील. आवश्यकतेनुसार त्यात बदल करू शकेल. शिवाय एखाद्या कार्याकरिता उपसमिती नियुक्त करू शकेल व त्यांच्याकडून विशिष्ट काम वेळोवेळी माहिती घेऊ शकेल व कार्यसमाप्ती नंतर उपसमिती रद्द करू शकेल. संस्थेच्या शाखा उपशाखांना मान्यता देणे, त्या काढून घेणे, संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करणे, हिशोबावर नियंत्रण ठेवणे, तक्रारींची दखल घेणे. कार्यकारी मंडळाने रिक्त स्थान भरणे सेवकांची नियुक्ती करणे, त्यांना काढून टाकणे, व अन्य आवश्यक ती सर्व कामे करणे बहुमताने; मंजूर झालेला ठराव कायदेशीर समजला जाईल.

१८. संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :-

सभासद फी, देणगी, वर्गणी अनुदान संस्थेचे व उत्पन्नाचे साधन राहील. संस्थेच्या उद्देशपूर्तीकरिता निधी गोळा करता येईल व तो स्थावर वस्तूंच्या मिळकतीसाठी गुंतविता येईल. अशा मिळकतीची नोंद पब्लिक ट्रस्ट रजिस्टर मध्ये बदल अर्ज देऊन करावी लागेल.

१९. उद्दिष्ट निहाय खर्चाचा तरतूद :-

ज्या उद्देशाने जी रक्कम गोळा केली असेल ती रक्कम त्या उद्देशावर १०० % खर्च करण्यात येईल.

२०. कर्ज किंवा ठेवी संबंधाचा तरतूद :-

संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून किंवा बँकेकडून कर्ज किंवा ठेवी स्विकारता येईल. त्याकरिता मे. धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२१. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबतचा तरतूद :-

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणे तसेच विक्री करणेचा अधिकार राहील. संस्थेला त्या करिता कार्यकारी मंडळाचा बहुमताने संमती घ्यावी लागेल. संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ~~[illegible]~~ पूर्वी मे. धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांचा पूर्व

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
[illegible]

President
Bhawani Sevabhavi Sanstha.

...रवानगी होणे आवश्यक राहील.

२२. बँक खाते :-

संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता असलेल्या शेड्यूल्ड बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. अध्यक्ष, सचिव किंवा कोषाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांचे संयुक्त सहीने रक्कम काढता येईल.

२३. सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :-

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम १७ प्रमाणे दरवर्षी अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यालयात कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एकच्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकांचे कार्यालयात पाठवावी लागेल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ – अ प्रमाणे १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस ठेवलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी, अटी बाबतचे विवरण अनुसूची तीनच्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकांचे कार्यालयात पाठवावे लागेल.

२४. नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतूद :-

संस्थेच्या नियम आणि नियमावलीत बदल करावयाची असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजूर करून नियमावलीत बदल करता येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था,
[illegible]

President
Bhawani Sevabhavi Sanstha,

संस्थेच्या नांवात व उद्देशांत बदल करावयाच्या तरतुद :-

संस्थेच्या नांवात किंवा उद्देशांत बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्थांचे एकत्रीकरण करावयाचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ अथवा १२-अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

२६. विसर्जन :-

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे घेणे बाबतचे व्यवहार पुर्ण करावे. त्यानंतर संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेस दान म्हणून देता येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

::- दाखला -::

प्रमाणित करण्यात येते की ही प्रत "भवानी सेवाभावी संस्था, परभणी ता. जि. परभणी." या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.क्र. | सभासदांचे संपुर्ण नांव | हुद्दा | सही. |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रताप भास्करराव देशमुख | अध्यक्ष | (सही) |
| २. | श्री. सुधाकर गंभीरराव पाटील | उपाध्यक्ष | (सही) |
| ३. | श्री. अब्दुल हादी अब्दुल करीम | सचिव | (सही) |

दिनांक :- २०.१२.९६.
ठिकाण :- परभणी.

अध्यक्ष
भवानी सेवाभावी संस्था
परभणी

President
Bhawani Sevabhavi Sanstha,
Parbhani.